राज्यातील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी मंजुरी.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग
शासन निर्णय क्रमांक: पिईसी-३३९६/(७४७९)/तांशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक: २५ जुलै, १९९६.

संदर्भ := अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे क्रमांक-एफ-७१३-१-२/डी/९६, दिनांक १९.७.९६ चे पत्र.

शासन निर्णय := अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी त्यांच्या संदर्भाधीन दिनांक १९.७.९६ च्या पत्रान्वये काही अटि व शर्तिवर खालील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयांना सन १९९६-९७ पासून नवीन औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी पूर्वमान्यता दिलेली आहे :-

| अ.क्र. | संस्थेचे नांव | अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता |
|---|---|---|---|
| [१] | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद | बी. फार्म | ४० |
| [२] | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती. | बी. फार्म | ४० |

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची सदर पूर्वमान्यता विचारात घेऊन या शासन निर्णयान्वये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने ज्या अटि व शर्तिवर वरील संस्थांना नवीन पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी मान्यता दिली आहे. त्याच अटि व शर्तिवर वरील संस्थांना त्यांच्या नांवासमोर दर्शविल्याप्रमाणे नवीन पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

२. यासाठी होणारा खर्च शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती या संस्थांसाठी १९९६-९७ या अर्थसंकल्पीय वर्षात करण्यात आलेल्या अनुदान तरतुदीतून भागविण्यात यावा. या दोन्ही संस्थांच्या औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमासाठी अर्थसंकल्पात अनुदानाची तरतूद स्वतंत्रपणे करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ [illegible] ]
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

..२/-

**शैक्षणिक वर्ष २०११-१२ मध्ये शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, अमरावती आणि औरंगाबाद येथे फार्म-डी हा अभ्यासक्रम सुरु <u>करण्याबाबत.</u>**

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**

शासन निर्णय क्र.टिइएम २०१०/(६७/२०१०)/तांशि-४,

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : १३ एप्रिल, २०११.

संदर्भ : १) फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडियाचे पत्र क्र. 50-226/2009-PCI/12337-39, दिनांक ६ ऑगस्ट, २०१०.

२) फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडियाचे पत्र क्र. 50-211/2010-PCI/28680-82, दिनांक ३१ जानेवारी, २०११.

३) संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. २/एनजीम/२०११/फार्मडी/२८५१, दिनांक १० मार्च, २०११.

**<u>प्रस्तावना</u>** : फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली या संस्थेने त्यांच्या दिनांक ६ ऑगस्ट, २०१० च्या पत्रान्वये शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, अमरावती आणि दिनांक ३१.१.२०११ च्या पत्रान्वये शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, औरंगाबाद येथे शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून फार्म-डी हा अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यास अनुसरुन तंत्रशिक्षण संचालनालयाने त्यांच्या दिनांक १०.३.२०११ च्या पत्रान्वये सदर दोन्ही ठिकाणी फार्म-डी अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून सुरु करण्यासाठी शासनाची मान्यता अपेक्षिली आहे. सदर पार्श्वभूमीवर सदर दोन संस्थांमध्ये फार्म-डी अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u>** :- शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, अमरावती आणि शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, औरंगाबाद येथे फार्म डी अभ्यासक्रम (प्रवेशक्षमता प्रत्येकी ३०) शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून सुरु करण्यास खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

(१) फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडियाकडून सदर दोन्ही संस्थांकरिता फार्म-डी अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०११-१२ करिता मान्यता पत्र (Letter of Extension) प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी संबंधित संस्थेच्या प्राचार्यांची राहिल.

(२) दोन्ही संस्थांतील प्राचार्यांनी फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडियाने विहित केलेल्या सर्व अटी व शर्तींचे काटेकोरपणे पालन करावे.

(३) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

(४) सदर अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील तरतुदीनुसार संबंधित विद्यापीठाची मान्यता/संलग्नीकरण घेणे आवश्यक आहे.

(५) सदर पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार/पध्दतीनुसार करण्यात येतील.

(६) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

In. 468

Principal
Govt. Pharmacy College,
Amravati.

Principal
Govt. Pharmacy College,
Amravati.

(७) याशिवाय संचालक (तंत्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

(८) संस्थेने त्यांच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे अंतिम वर्ष पूर्ण होण्यापूर्वी फार्मसी अॅक्ट, १९४८ च्या कलम १२ मधील तरतुदीनुसार फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची विहित मान्यता प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(भ. सं. वानखेडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती/औरंगाबाद.
कुलसचिव, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.
कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
प्राचार्य, शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, अमरावती
प्राचार्य, शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, औरंगाबाद.

**प्रत माहितीसाठी :-**

रजिस्ट्रार कम सेक्रेटरी, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, संयुक्त परिषद भवन, कोटला रोड, ऐवान-ए-गालिब मार्ग, पोष्ट बॉक्स नं. ७०२०, नवी दिल्ली ११०००२
निवडनस्ती/तांशि-४

Principal
Govt. Pharmacy College,
Amravati.

Principal
Govt. Pharmacy College,
Amravati.

राज्यातील शासकीय व खाजगी संस्थांना एम.ई./ एम.टेक.व एम.फार्म अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी मान्यता.

---

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय, क्रमांक : टीईएम-२००४/(४१०/०४)/तांशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १२ ऑगस्ट, २००४

**संदर्भ :** अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांची दि.२२.७.२००४ ची पत्रे.

**शासन निर्णय** : अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने त्यांच्या संदर्भाधिन दिनांक २२.७.२००४ च्या पत्रान्वये राज्यातील शासकीय व खाजगी संस्थांना **एम.ई./ एम.टेक.व एम.फार्म अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी मान्यता दिली आहे.** सदर मान्यता विचारात घेऊन खालील संस्थांच्या नावासमोर दर्शविलेल्या अभ्यासक्रमांना शैक्षणिक वर्ष २००४-०५ पासून खाजगी संस्थांना कायम विना अनुदान तत्वावर व शासकीय संस्थांना स्वयंसहाय्यित तत्वावर या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता | वर्ष |
|---|---|---|---|---|
| १. | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, काथोरा नाकाजवळ, अमरावती | १) स्ट्रक्चरल इंजि. (एम.ई.सीआयव्हीआय ) | १८ (१०जनरल + ५नामनिर्देशित + ३एस.सी./एस.टी.) | २००४-२००६ |
| २. | शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय शिवाजी नगर, अमरावती | १) फार्माकॉग्नासी ॲण्ड फायटोकेमिस्ट्री (एम.फार्म) | ०८ | २००४-२००६ |
| ३. | सरदार पटेल कॉलेज ऑफ इंजि.भवन्सचे कॅम्पस, मुन्शी नगर, अंधेरी (पश्चिम), मुंबई ५८ | १) इन्व्हार्येमेंटल इंजि. (एम.ई.सीआयव्हीआय ) | १८ (१०जनरल + ५नामनिर्देशित + ३एस.सी./एस.टी.) | २००४-२००६ |
| ४. | विश्वेश्वर्या नॅशनल इन्स्टि. ऑफ टेक्नॉलाजी, दक्षिण नागपूर, साऊथ अंबाजरी रोड नागपूर-११ | १) वॉटर रिसोर्सेस इंजि. ( एम.टेक.) | १८ (१०जनरल + ५नामनिर्देशित + ३एस.सी./एस.टी.) | २००४-२२०६ |
| ५. | राजाराम बापू इंस्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, राजाराम नगर, साखराळे, जि.सांगली १४ | १) प्रोडक्शन इंजि.(एम.ई.) | १८ (१०जनरल + ५नामनिर्देशित + ३एस.सी./एस.टी.) | २००४-२००६ |

Govt. College of Pharmacy
AMRAVATI.
584
21/8/04

1 AF
Urgent apply for affiliation
21/8

सदर मान्यता खालील अटी व शर्तीवर देण्यात येत आहे :-

१) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहीत केलेल्या तसेच दि.२१ मे,१९८३ च्या शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या अटींची पूर्तता करणे संस्थेस बंधनकारक राहील.

२) शासनाने विहीत केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहीत केलेल्या सर्व अटी व शर्ती (शिक्षण शुल्क व प्रवेश प्रक्रियेसह) मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल तसेच संबंधीत कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता तंत्रशिक्षण संचालाकंच्या संमतीने समाधानकारक रित्या करण्यात येईल.

३) या अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणासाठी संबंधीत संस्थेने संबंधीत विद्यापीठाची मान्यता घेणे आवश्यक आहे.

४) संबंधीत संस्थेने संचालक, तंत्रशिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचित ठेंव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी. (सदरहू अंट शासकीय संस्थेसाठी लागू राहणार नाही. )

५) प्रस्तावित अभ्यासक्रमांसाठी जे प्रवेश नियम लागू करण्यात आलेले आहेत त्याप्रमाणे विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावा.

६) प्रस्तावित अभ्यासक्रमासाठी जे शिक्षण शुल्क लागू करण्यात आले आहे तेच शिक्षण शुल्क विद्यार्थ्यांकडून घेण्यात यावे.

३. याबाबत आवश्यक त्या औपचारिक बाबींची पूर्तता करण्यासाठी संबंधीत संस्थेने संचालक, तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई १ यांच्याशी त्वरीत संपर्क साधावा. संचालक, तंत्रशिक्षण यांनी याबाबत आवश्यक त्या नोंदी अभ्यासक्रम विषयक नोंदवहीत ठेवाव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( श्या.र.चौरे )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रति,
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
मा.कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई
मा. कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे
मा.कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
मा.कुलसचिव, नागपूर विद्यापीठ, नागपूर
मा.कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव,
मा.कुलसचिव, अमरावती विद्यापीठ, अमरावती
सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नागपूर, अमरावती, नाशिक
संबंधीत संस्थांना / निवड नस्ती तांशि-१

प्रत,

१) अतिरिक्त सचिव (तांत्रिक) भारत सरकार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, इंदिरा गांधी खेल परिसर, इंद्रप्रस्थ इस्टेट, नवी दिल्ली ११०००

२) सहाय्यक शिक्षण सल्लगार (तांत्रिक) भारत सरकार मनुष्यबळ विकास मंत्रालय, (शिक्षण विभाग) पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रीयल इन्श्युरन्स बिल्डींग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई